# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक

**महत्त्वाचे**

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/१९६६

दिनांक : 22 JUN 2018

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
योजनेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ५० टक्के शुल्काची रक्कम न घेणेबाबत

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१८/७९९,
दि. २०/०६/२०१८

संदर्भीय पत्रान्वये सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्याक्रमाच्या संस्थांना कळविण्यांत येते की, शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि. ०७/१०/२०१७ अन्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४२ मधील तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत :-

"तथापि, उपरोक्त मुदतीपूर्वी महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांनी सदर योजने अंतर्गत विद्यार्थ्यास अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी आगाऊ स्वरुपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री शैक्षणिक संस्था करेल. तसेच संबंधित पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास वरीलप्रमाणे डिबीटीद्वारे अनुज्ञेय शिष्यवृत्तीची रक्कम ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालय/तंत्रनिकेतनास शुल्कापोटी तात्काळ अदा करावी व याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत विद्यार्थ्याची असेल."

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावी. त्यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यांत येऊ नये.

प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून विहीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्केपेक्षा जास्त शुल्क घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांविरुध्द नियमानुसार तात्काळ कारवाई करण्यांत येईल. उपरोक्त तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यांत यावी. असे संदर्भीय परिपत्रकान्वये मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी कळविलेले आहे. तरी सर्व संस्थांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई